भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०३/२०१७

**१) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन धारदार वस्तुने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २५/०३/२०१७ चे २१.५९ वा. दरम्यान यातील आरोपी व जखमी रोशन भाऊराव गडपायले वय ३० वर्ष व सुरेंद्र ताराचंद चौके वय ३० वर्ष दोन्ही रा. मांगली हे मित्र असुन यांच्यात आपसी भांडनावरून आरोपीने दोन्ही जखमींना धारदार वस्तुने पोटावर मारून जखमी केल्याने डॉक्टर एमएलसी रिपोर्ट व चौकशी अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोना पडोळे यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे, स्कुल बसला धडक दिल्याने स्कुल बस झाडाला आदळल्याने तीन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा :—**

दिनांक १६/०३/२०१७ चे ०७.१५ ते ०७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी अजगर अली उस्मान अली सैयद वय ४५ वर्ष, रा. वार्ड न. २८ भोपाल (म.प्र) याचा सोबती स्कुल बस क्र. सीजी ०४ टीसी ०१२७ चालवित येत असतांना साकोली कडुन मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन समोरील स्कुल बसला धडक दिल्याने रोडच्या बाजुला असलेल्या झाडाला आदळल्याने त्यामध्ये बसलेले चालक दिनेश, मोहम्मद अली व यनुस मुजुमदार या तिघांना जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने व पोलीसांना घटनेची माहीती न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) बोलेरो पिकअप चालकाच्या निष्काळजीपणामुळे कारला धडक देवुन कारचे नुकसान,अपघाताची सुचना देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २४/०३/२०१७ चे २१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी भुषण रतिराम मेंढे वय ३६ वर्ष रा. महालगाव सुकळी यांची कार क्र. एमएच ३६ एच ३७६९ ही रोडचे बाजुला ऊभी असता कारचे मागेहुन येणाऱ्या आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे कारचे मागील बाजुस धडक दिल्याने फिर्यादीचे कारचे १६,०००/रू. चे नुकसान झाले व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीने दि. २६/०३/२०१७ ला रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,४२७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

४) अवैध दारु अडयांवर धाडी . :—

दिनांक २६/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, सिहोरा व आंधळगाव येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३६ लिटर हा.भ. दारू किंमती २,०००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

27.3

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.